3026

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक २८५० (८३४)

ग्रंथ नाम गोदा महात्म्य.


विषय माहात्म्य

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai "

॥ अथगोदावरीमाहात्म्यप्राकृतप्रारंभः ॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai"

1A



श्रीगणेशायनमः ॥ नमुंमंगलारंभिमंगलधाम ॥ नमितोंशारदासर्वगुणग्राम ॥ वंदूनिकेशवगुरुपादपद्म ॥ सरोरुहसद्मजयेंचे ॥१॥ करवीरवासिनीश्रीविश्वमाता ॥ श्रीआदिलक्ष्मीममकुलदेवता ॥ नमूनित्रिशुध्धिपिताआणिमाता ॥ तथान्नदातानमूनिया ॥२॥ नमितोंदेवाणिग्रहवास्तुदेवा॥तथैवपंडितब्राह्मणभूदेवा ॥ प्राचीनकविसिध्धश्रीज्ञानदेवा ॥ नाथैकभाक्षानमूनिया ॥३॥ नमितोमंहतसंतांणिसज्जनां॥त्यापरिवक्ताणिश्रोतारसुजनां ॥ अनुग्रहव्हावाकरितोप्रार्थना ॥ प्राकृतरचनाआरंभु॥४ नारदउवाच ॥ कैसेनिपरमेष्ठीप्राणिमात्रांमुक्ती ॥ होईलयालागिवदयोग्ययुक्ती ॥ कोणत्याप्रकारेसाधनप्रयुक्ती ॥ श्रवणीप्रसक्ताजाहली ॥५॥ जपध्यानपूजनयोगसाधन ॥ अथवायथाविधिकरितांदान ॥ किंवामखयज्ञसत्रादियजन ॥ वातीर्थसेवनसर्वदां ॥६॥ मुक्तिपथसाधनकर्मचतुष्ट ॥ यामाजिसुखसाध्यमुक्तीवरिष्ट ॥कोणत्याप्रकारेसकलासिइष्ट ॥ तेचिसुरश्रेष्ठआज्ञापी ॥७॥ ब्रह्मोवाच ॥ त्रिसाधनाहूनितीर्थप्रभाव ॥ जाणतिमुनिवरामहानुभाव ॥ पुण्यप्रदायकमुक्तऋषिराव ॥ घेतिअनुभवस्वार्गीचा ॥८॥ नारदउवाच ॥ कैसेनिनिर्माणजाहलींविशद ॥कोणत्याप्रकारेवदतीर्थभेद ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

सविस्तरकरणेतीर्थानुवाद ॥ श्रवणेंअमोदहोतसे ॥९॥ ब्रह्मोवाच ॥ ऋषिआणिनृ
पतीदोघेमानव ॥ दैत्यादिराक्षसआणिकदानव ॥ याहूनिअतिपुण्यसरितादेव ॥ त्या
हूनित्रिदेवनिर्मितां ॥१०॥ राजतीर्थाधिकऋषितीर्थपवित्र ॥ असुरकृत्तीर्थेत्याधिकप
वित्र ॥ अमरकृत्तीर्थेंअतिपुण्यपात्र ॥ मिहारित्रिनेत्रत्याहुनि ॥११॥ अत्यंतपावनत्रै
लोक्यमान्य ॥ तत्तुल्यत्रिभुवानिंनतीर्थआन्य ॥ सर्वदासेवनकरितीअनन्य ॥ तेचि
नरधन्यतापसा ॥१२॥ भरतखंडांतारिदंडकारण्य ॥ जंबुद्वीपभुमिदेशअतिपुण्य ॥
पापनाशकजेविबृहदारण्य ॥ सरितांवरेण्यअसती ॥१३॥ दक्षिणसिंधुआणिगिरि
हिमवंता ॥ मध्येंदेवकृतद्वादशसरितां ॥ अत्यंतपावनपापसंहरता ॥ श्रृणुबुध्धिमं
ताआदरे ॥१४॥ विंध्योत्तरआणिहिमयाम्यमानी ॥ विशोकावितस्ताहिमसान्निधा
नी ॥ चत्वारिसरिताअतिमोक्षदानी॥पृथकाभिधानीसांगतो ॥१५॥ ज्यान्हवीयमुना
तृतीयभारती ॥ नर्मदाजीवनिशंभुचिवसती॥ पावनलोकिंनदीषट्कजगतीं ॥याहूनि
सुमतीआधिका ॥१६॥ विंध्याद्रिहूनिदक्षिणसमुद्रा॥ मध्येनदीषट्कश्रेष्टतपरद्रा॥तप १
तीगोदाआणिकृष्णाभीमचंद्रा॥ मुनितुंगभद्रापयोष्णी ॥१७॥द्वादशसरितानिर्मितेअ

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

3A

मर ॥ पुष्करेनिर्माणकारकअसुर ॥ ऐकअभिधानेंतयांचिप्रचुर ॥ महाबलधीरप्रता
पी ॥१८॥ गयासुरशृंगकत्रिपुरासुर ॥ नमुचिपातालकेतूकोळासुर ॥ अंधकहयमुख
लवणासुर ॥ मयमायासुरमुनींद्रा ॥१९॥ परिसोनिपांहेतपसासमर्थ ॥ ऋषिनिर्मा
णितिजगपावनार्थ ॥ पवित्रकारकअतिपुण्यतीर्थ ॥ नामेंहितार्थअनुभवी ॥२०॥ प्र
भासभार्गवनरनारायण ॥ आगास्तिभरद्वाजवसिष्ठपूर्ण ॥ कश्यपगौतमऋषीश्वरजा
ण॥करिकाश्रवणभूपती ॥२१॥ अंबरीषवृषाकपिहरिश्चंद्र॥ कनखलकुरुअश्वयूथनरें
द्र ॥ सगरनागकेतश्रीरामचंद्र ॥ भरतनहुषनारदा ॥२२॥ भेदतीर्थांचेपरिसेचतुर्वे
ध ॥ देवदानवऋषिराजेप्रसिद्ध ॥ आणिकपर्वतीयतीर्थेविविध ॥ फलद्रूपासित्धआ
सतीं ॥२३॥ परित्रिदेवनिर्मितजेकांतीर्थ ॥ वदबेनत्याचापुण्यफलदार्थ ॥ स्मरणें
चिहोतिचारिपुरुषार्थ ॥ सिद्धसकलार्थवंदनें ॥ २४ ॥ ॥ नारदउवाच ॥ त्रिदेवनि-
र्मितकोणतिसरिता ॥ त्रैलोक्यपावनीउद्धरीजिगतां ॥ त्रिपथगामिनीकैसेनिभवितां
विधिपुण्यवार्तानिरोपी ॥ २५ ॥ ॥ ब्रह्मोवाच॥ महाअघहंत्रीगौतमीवरिष्ठा ॥ स
कलतीर्थात्मकपावनीश्रेष्ठा ॥ त्रिदेवनिर्मितशुध्धमुनिज्येष्टा ॥ त्रिलोकप्रतिष्ठामोक्ष

दा ॥२६॥ अतिपुण्यसरितागौतमीगंगा ॥ स्मरणदर्शनवास्पर्शीताअंगा ॥ कृतपूर्व
दुरितैंजातीलभंगा ॥ पुण्यमहाभागासर्वदां ॥२७॥ योगतपयज्ञीपृथकफलार्थ ॥
गौतमीस्मरणेसाध्यसकलार्थ स्वमुखेनवदेवमोक्षप्रदार्थ ॥ परिसेयथार्थमुनींद्रा॥२८
दशसहस्त्रसंवत्सराचेपूर्वी ॥ तारकासुरदैत्यमाजलागर्वी ॥अधिकारहरिलेस्वर्गादिउ
र्वी ॥ मजलागिसर्वीप्रार्थिले ॥२९॥ भिंऋषिइंद्रादिसमस्ताविबुधी ॥ आक्रमणके-
लाक्षीरोदधी ॥ प्रभुशेषशायीकरुणाजलधी ॥ स्तविलामहाधीसुरेंद्रे ॥३०॥ इंद्रउ
वाच ॥ श्लोक ॥ त्वंत्राताजगतांनाथदेवानांकीर्तिवर्धन ॥ सर्वेश्वरजगद्योनेत्रयीमूर्त्ते
नमो ऽस्तुते ॥१॥ लोकस्त्रष्टासुरान्हंतात्वमेवजगतांपतिः ॥ स्थित्युत्पत्तिविनाशानां
कारणंतुजगन्मय ॥२॥ आदिकर्तावराहस्त्वंमत्स्यःकूर्मस्तथैवच ॥ इत्यादिरूपभेदै
र्नोरक्षसोभयआगते ॥३॥ त्रातानकोप्यस्तिजगत्त्रयेपिशरीरिणांसर्वविपद्गतानां ॥
त्वयाविनावारिजपत्रनेत्रतापत्रयाणांशमनंनचान्यत् ॥४॥ ॥टिका॥ स्तवितांप्रत्यक्ष
जाहलाप्रगट ॥ पातलाश्रीविष्णुअमरानिकट ॥ नमिलासुरेशेमाझियेसगट ॥ वद
लोसंकटसर्वही ॥३१॥ परिसोनिवदलाप्रभुजगदीश ॥ लघुबालहस्तेअसुरविनाश॥

(५A)

होईलपरिनसेबालदेवेश ॥ मजहिनसेनशंकरा ॥३२॥ अथापितुजलागिसांगतोयु
क्ती ॥ दक्षमखिअंबीकाकरीलदेहमुक्ती ॥ पुनरावतरेहिमोदरीशक्ती ॥ सत्यममउक्ती
सुरेशा ॥३३॥ यालागिसत्वरहिमालयप्रार्थी ॥ मेनाअनकूलकरणेयदर्थी ॥ माया
आवतरेसुरसाहायार्थी ॥ दैत्यनाशार्थीशिववधू ॥३४॥ कार्तीकेयतिजलाहोईलपुत्र
छेदीलअसुराचेप्रधानगात्र ॥ श्रीकांतवदतांसहस्त्रनेत्र ॥ अंतिहर्षपात्रजाहला ॥३५
नारायणाप्रतिवंदूनिअचळ ॥ पावलोवृतांतकथिलासमूळ ॥ तारकासुरानेकरूनिवि
कळ ॥ हरिलेसकळस्त्रियादी ॥३६॥ यालागिपातलोतुजगिरिवर्या ॥ सभार्यअनकू
लहोसुरकार्या ॥ कन्यामेनोदरिंहोईलअर्या ॥ शंकरभार्याहरिकृपे ॥३७॥ यालागि
सुरवरवरप्रसाद ॥ करितिसप्तऋषिआशीर्वाद॥तथास्तुवचनेहिमअनुवाद ॥ करिसं
वादसंतोषे ॥३८॥ स्वमुखेवदलोमेनागिरिहिमा ॥ आदिशक्तिमायाअंबिकापरमा ॥
श्रध्दामेधाधृतिस्मृतिलज्जाक्षमा ॥ गर्वीनगोत्तमाप्रविष्टो ॥३९॥ ह्मणताचिमेनाबहुह
ष्टपुष्ठ ॥ गर्भाधानकारिहिमागिरिश्रेष्ट ॥ दंपत्यमुनिवरामनसंतुष्ट ॥ कन्यकावरिष्ट
जाहली ॥४०॥ पुनरपिसर्वत्रलंघूनिआद्री ॥ गिरिजावंदिलीपुरोगमईंद्री ॥ वर्ध-

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Rashtriya Chhatrapati Shahu ... Joint Project of ... Mumbai

(5)

गोदा. तिजाहलीकळाजेविचांद्री ॥ सिध्धिपुरंध्रीमिरवती ॥४१॥ सप्तवर्षात्मकजाहालियाश म.अ०
३ क्ती ॥ देवतिजलागिप्रबोधनयुक्ती ॥ सांगतिशंभर्वीमनसाप्रसक्ती ॥ करिनित्यभक्ती १
शिवाची ॥४२॥ यापरिजपध्यानआचरेगौरी ॥ कर्तव्ययोजनारचिलिअमरि ॥ कै
सेनिशंकरसमाधिउतरी ॥ यदर्थीविध्यारीबैसले ॥४३॥ त्यामाजिसुरगुरुवदलाउक्त॥
समाधीरतिपतिकरीलमुक्त ॥ अमरागुरुवाक्यमानलेंयुक्त॥ सर्वीयथोक्तभाविले ॥४४
शक्रमदनाप्रतिकरिताचिआज्ञा ॥ वदलामजपुढेसमाधीप्राज्ञा ॥ कायसीभंगेलकरि
तांसर्वज्ञा ॥ गर्वीतप्रतिज्ञाबोलिला ॥४५॥ टाकूनिजातसेगिरिहिमवंत ॥ साहायघे
तलासरिसावसंत ॥ मन्मथमुनींद्राबहुबुध्धीमंत ॥ परित्राणांतहोसरला ॥४६॥ गर्वे
चिनाडिलेतपोधनभूप ॥ गर्वेचिनिमालेदानवअसुप ॥ गर्वेचिमुनिवरामृत्युचेरुप ॥
सर्वसुखरूपनिगर्वी ॥४७॥ आसोकामपावलाशिवसन्निधीं ॥ शरपुष्पधनुषींकरूनि
सिध्धी ॥ बाणेकशंकरासीविंधी ॥ दृष्टिप्रसिध्धउघडली ॥४८॥ तीसरेनयनींप्रगट
लाअग्न ॥ सौदामिनीजेविकोटिवरिलग्न ॥ रतित्यामाजींभस्मसामग्न ॥ अमरउद्वि ३
ग्नजाहले ॥४९॥ परिशंभुच्याहृदयींउदेलाकाम ॥ वांछितमानसींगृहाश्रमधर्म ॥

(5A)

त्यावसरीवसंतेंवनविश्राम ॥ पुष्पेंआरामशोभविविलें ॥५०॥ त्यामाजींकूजतीको-
किळासुस्वरें ॥ सपिछनर्तनकरितींमयूरे ॥ मंजुळसाळयाबोलतीमधुरें ॥ झुंकारेंभ्र
मरगुंजती ॥५१॥ वायुकरिताहेदशदिशाबंध ॥ अनेकतरुंचेंबहुविधगंध ॥ मंदगति
वाहेसमीरसुगंध ॥ शिवकामांधहोनारदा ॥५२॥ जाणूनिपातलोंदेवऋषिमेळीं ॥ वं
दुनित्रार्थिलाशिवचंद्रमौळी ॥ हिमाद्रिकन्यावधूयोग्यसकळीं ॥ सांगतांदुकाळीभोज
ना ॥५३॥ त्यापरिआनंदशिवातरयामीं ॥ होतांचिप्रगटलाखगेंद्रगामी ॥ समुच्चयेंपा
वलोहिमालयधामीं ॥ शिवलग्नकामीनारदा ॥५४॥ मन्मथनिमालाउघडितांदृष्टीं ॥
बहुशोकदुःखेंरतिहोयकष्टी ॥ मजलागिवैधव्यहेपरमेष्टी ॥ लिहिलेंअदृष्टींकासया
॥५५॥ ह्मणतांचिमानसींद्रवलाईश ॥ पाहतांकृपान्वितवामाक्षलेंश ॥ अनंगमन्मथ-
उठवीमहेश॥उभयीं.उमेशवंदिला ॥५६॥ मदनउठवितांरातिसंतुष्टा॥ अनंगईतुकेनिवा
टतिकष्टा ॥ जाणूनिअंतरीशिवसर्वद्रष्टा देहिकांनिविष्टयोजिला ॥५७॥ जगातरींवस
तीपुर्वीपंचक ॥ कामसाहवांतयावरीएक॥ योजनाकरितांहोयरिपुषट्क ॥ त्याहुनिअ
धिकमनाचे ॥ ॥५८॥ प्राबल्यपाहेअनुभवसमस्ता ॥ ईकडेबोधितांहिमगिरिपर्वता

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

गौरीसींलागलिशंकरअवस्था ॥ विवाहव्यवस्थामांडिली ॥५९॥ विश्वकर्म्याप्रतिक
करऊनिआज्ञा ॥ मणिमयमंडपरचिलाप्राज्ञा ॥ वरिमुक्ताफळाचितोरणेंसूज्ञा ॥ अं
गणेंअभीज्ञापाचुचीं ॥६०॥ रत्नखचितात्मकमध्धेवेदिका ॥ लोकत्रयाप्रतिलेखनप
त्रिका ॥ करूनिवांझेंमसुदिनिंसम्यका ॥ शृणुपुण्यश्लोकापातलो ॥६१॥ अंरुधतीस
हीतआलेवासिष्ट ॥ अनुसूयाअत्रितापसविशिष्ट॥लोपामुद्रेसिअगस्तिमुनिश्रेष्ट॥गौत
मवरिष्टअहल्या ॥६२॥ वरुणयमअग्निइंद्ररुद्रसर्व ॥ कुबेरमारुतमरुद्गणसर्व ॥ अम
रादिकिन्नरयक्षगंधर्व ॥ आप्सरसराअपूर्वशेषादी ॥६३॥ सुरभिसुनंदानंदानंदिनी ॥
धेनुसुधेनुमुनिकाममोहीनी ॥ सोमार्कमातृकाकुमारअश्विनी ॥ हिमाद्रिगमनींजाह
ले ॥६४॥ ग्रहगुरुशुक्रतारकामहाधी॥ नवनिधिसहीतअष्टमासीध्धी॥नदनद्याआले
सप्तहिउदधी ॥ सर्वत्रऔषधीमुनींद्रा ॥६५॥ शंकरासरिसेमीगरुडगामी॥ गणसप्त
कोटिशंभवानुगामी ॥ वृषअश्वजाहलाथरकेलगामी ॥ हिमगिरिगामीजाहलें ॥६६
अतिरम्यवृक्षेंशोभेगिरिवर ॥ अनेकलतिकांसुमनसंभार ॥ असंख्यपक्षीशुकापिकम
यूर ॥ नानावनचरेंआसती ॥६७॥ बहुकूपवापीतडागसरस ॥ बकचक्रवाकेंआणि ४

6A

राजहंस ॥ चतुरंगपद्मेंकरितीविकास ॥ भ्रमरसुवाससेविती ॥६८॥ शंकराअभिमुख
येताहिमाद्रि ॥ त्यासवेंबहुविधअसातिअद्रि ॥ मेरुमंदराणिस्वर्णरजताद्रि ॥ द्रोणशेषा
द्रिशतगिरी ॥६९॥ काम्यगिरिअस्तादिउदयाचळ ॥ मैनाकंदेवगिरिमलयाचळ॥ ऋ
षिमुखसुवेळत्रिकूटाचळ॥लक्षैकअचळपातलें ॥७०॥ चतुर्विधवाद्येंहोतसेंगजर ॥ मिर
वतमंडपींयेतांशंकर ॥ पूजूनिगिरिबरेंसर्वोपचार ॥ वेष्टितअमरेंविराजे ॥७१॥ देव
ऋषिगणासहदेतीमान ॥ बैसऊनिआसनींविराजमान ॥ उपचारेंअर्पिविष्णुभगवा
न ॥ तांबूलपानेंमुनिवरां ॥७२॥ पुण्याहवाचनकलशादिसूप ॥ गिरिजाआणूनिशंक
रासमीप ॥ सुमंगलअष्टकेंशोभनालाप ॥ लग्नसुखरूपलाविलें ॥७३॥ दुंदुभिसन
याबहुवाद्यघोष ॥अप्सरानाचतीगायनविशेष॥ जयशब्दकरितीसुरसंतोष ॥ फणान्वि
तशेषडुल्लती ॥७४॥ यथाविधिंकरितीप्रत्यक्षवेद ॥ ऋषीश्वरवदतीआशीर्वाद ॥ गिरि
वरकरितीप्रीतिसंवाद ॥ दंपतीप्रमोदमुनींद्रा ॥७५॥ चतुर्विधअन्नेंपचवीपाकशासन॥
अपांपातिकरवीशुद्धजलपान ॥ सिद्धिसकलातेंकरितीअन्नदान ॥ तांबूलदानसुरपति
॥७६॥ वधूवरआणूनिवेदिकाप्रस्तीं ॥ स्वयेंसिद्धकेलाहुताशनस्वस्ती ॥ लाजाहवन

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

गोदा. ५

करिमैनाकहस्तीं ॥ सोहळासमस्तींपाहिला ॥७७॥ अश्मकींपार्वतीस्पर्शूनिचरणें ॥क
रितांप्रदक्षिणाअग्नीकारणें॥ मींसव्यपादांगुष्ठपाहतांजाणे ॥ पूर्वआचरणउदेलें॥७८
माझियेअंगींप्रगटलामदन ॥ होयवस्त्रांतरींमद्वीर्यस्खलन ॥ रजःकणजाहलेघर्षितां
जघन ॥ तापसीलाहनजन्मलें ॥७९॥ उत्पन्नहोतांचिमुनिवालखिल्ये ॥ लज्यायमा
नमजप्राप्तवैकल्य ॥ सखिन्नमजमेंमरणातुल्य ॥ मदनप्राबल्यनारदा ॥८०॥ ता
त्काळभीतींपाऊनिमनसा ॥ पळायनकरिताजाहलोसहसा ॥ शंभुनंदीगणप्रेरूनि
सरिसा ॥ सन्निधतरसाआणिलें ॥८१॥ आश्वासूनिमजकरिनाभिकार ॥ कृपान्वि
तप्रीतिबदलाशंकर ॥ तुजकायशंकाकामअनिवार ॥ परिदुष्टाचारजाहला ॥८२॥ या
लागिकरणेंविधिआत्मशुद्धी ॥ कैसेनिहोसरवदलात्रिशुद्धी ॥ शिवह्मणेलोकींउदकें
शुद्धी ॥ तीर्थप्रसिद्धसुरवरा ॥८३॥ शंभुत्वष्टयाप्रतिकरितांचिआज्ञा ॥ मृन्मयकमंडलु
रचिलाप्राज्ञा ॥ पार्षदगणसर्वप्रेषूनिसूज्ञा ॥ तीर्थेंसर्वज्ञाआणविलीं ॥८४॥ सप्तार्ध
कोटिचेआणऊनिउदक ॥ सिंधुपुष्करादिपुण्यदअनेक ॥ आणिलींसुतीर्थेंशोधूनिलो
क ॥ कमंडलुएकभरियेला ॥८५॥ पवमानसूक्तेंशिवाभिमंत्रित ॥ कमंडलुमजळाना

मा अ० १

५

7A

रदादेत ॥ त्याचेनिमुनींद्राजाह्लापुनीत ॥ जळालेंदुरिततत्क्षणीं ॥८६॥ यापरिमुनि
वराजन्मलीगंगा ॥ तदुदकवायुह्मगटतांअंगा ॥ अनेकजन्मीचाकरिभवभंगा ॥ सक
ळश्रीरंगींमेळवी ॥८७॥ गंगाजन्मलीह्मणूनिमुनिवरा ॥ संतोषजाह्लासमस्तपितरा॥
अमरेंकरूनिजयजयकारा ॥ सुमनसंभारावर्षले ॥८८॥ महेश्वरगिरिजाशुभप्रस्थान॥
करूनिपावलेकैलासभुवन ॥ सुरमुनिसहीतगंगाजीवन॥ मींसत्यभुवनींपावलो ॥८९॥
भक्त्यापरिसतीउमाहरलग्न ॥ कृतपापसंचितहोईलभग्न ॥ पितरांसहपावतीशिवसल
ग्न ॥सर्वसुखमग्नभूलोकीं ॥९०॥ सकामकेल्यापठणवाश्रवण॥विद्याआणिआरोग्यअं
गनासद्गुण ॥ संतानगृहपशुअर्थऋणमोचन ॥ कामसंपूर्णपावती ॥९१॥ संस्कृत
व्यासोक्तअध्यायतीन ॥ आरंभइतिहासगंगाजनन ॥ तदर्थीप्राकृतकेलेंविरचन ॥ प
रिसोतसज्जनआदरें ॥९२॥ इतुकेनिरूपणझालेंपवित्र ॥ तेकेशवार्पणकरिकृष्णपुत्र
ऐकतितयांचेसभाग्यश्रोत्र ॥ स्वर्गसुखपात्रअक्षयी ॥९३॥ श्रोतारअध्यायपरिसो
तप्रथम ॥ अत्यंतपावनगौतमीपरम ॥ आख्यानअनुबंधहोतांव्युत्क्रम ॥ क्षमापुत्रस
मकरावी ॥९४॥ इतिश्रीब्रह्मांडपुराणप्रसीद्ध ॥ गौतमीमाहात्म्यपुण्यफलसिद्ध ॥ पंचा

Joint project of Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(8)

| | | |
|---|---|---|
| गोदा | णवसंख्याप्राकृतप्रबंध ॥ अक्षरनिबंधयोजीला ॥९५॥ श्रीरामकृष्णार्पणमस्तु ॥ | मा.अ० |
| ६ | ॥अध्याय॥ ॥१॥ वोव्या॥ ॥९५॥ श्लोक॥४॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ | १ |
| | | ६ |

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

8A

श्रीगणेशायनमः ॥ नमस्कारूनिवरदविनायका ॥ सरस्वतीनमितोब्रह्मकन्यका ॥
मस्तकींवंदूनिश्रीगुरुपादुका ॥ गौतमीसम्यकावर्णितो ॥१॥ नारदउवाच॥कमंडलूं
संस्थितगंगाहोता ॥ शंकरेंतुजलागिदीधलिधाता ॥ कैसेनिभूलोकींहियेपुण्यसरिता
तीविश्वजनितानिरूपि ॥२॥ ब्रह्मोवाच ॥ दैत्यविरोचनपुत्रबलिनामा ॥ प्रतापरवि
जणुयथार्थनामा ॥ पराजितकरूनिसुरसुत्रामा ॥ धर्मनीतिकामादयालु ॥३॥ ज्ञाता
गुरूभक्तअतिबुद्धिमंत ॥ धीरवीरवपुदृढवीर्यवंत ॥ऐश्वर्यदेईमुनिवरांअत्यंत ॥ परा
क्रमीदांतजयस्वी ॥४॥ त्रिलोकींपरिपूर्णजयाचेआज्ञा ॥ भयभीतनिर्जरहोऊनिप्रा
ज्ञा॥क्षीराब्धिनिकटींपातलेसूज्ञा॥विष्णुसर्वज्ञास्तवियेला॥५॥नमोजिहेविष्णोतुजला
भक्तसंतापहारीभला॥ ब्रह्मेंद्रादिदेवस्तवितीतुला॥यादवेंद्र।दयानिधे ॥६॥यापरिसुरा
चिअतिदीनवाणी ॥ ऐकूनिप्रगटेप्रभुचक्रपाणि॥ मस्तकेंनामिलाश्रीविष्णुचरणीं॥वि
नीतभाषणेंप्रार्थिला ॥७॥ श्रीभगवानुवाच ॥ भक्तशिरोमणिबलिदैत्यराव ॥ नहोय
त्याचासहसापराभव ॥ यालागिविबुधिंमेरुवरींठाव ॥ करूनिप्रभावविलोकावा ॥८॥
यापरिऐकूनिजगदिशआज्ञा ॥ सुरवरमंदिरींपावलेप्राज्ञा ॥ अदितिगर्भातूनिविष्णु

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

 सर्वज्ञा ॥ वामनसंज्ञाअवतरे ॥९॥ कश्यपउत्साहकरिताविशेष ॥ पुत्रत्वपावलापुरा 
णपुरुष ॥ सुरमुनिपाऊनिअतिसंतोष॥दुंदुभिघोषआरंभिला ॥१०॥ जोविघननील
नभांतरगाभा ॥ नीलमणिकांतिसतेजसुप्रभा ॥ नीलारविंदजणुश्रीमुखशोभा॥विश्व
मूलस्तंभाकामिनी ॥११॥ पालखाघालुनिवामनाभिधान॥ब्राह्मणकरितिसींमंतोन्नय
न ॥ यथाविधिचूडादिअन्नप्राशन ॥ चौलोपनयनजाहले ॥१२॥ ईकडेबलिशतपुर्णा
श्वमेध ॥ करितातपोधनआलेविविध ॥ उशनापुरोधाआचार्यप्रसिद्ध ॥ मंडपसिद्ध
करविला ॥१३॥ ऋत्विजवर्णिलेऋषीश्वरआर्य ॥ बलिराजदीक्षितमिरवेसाभर्य ॥
पुरोहितभार्गवमुख्यआचार्य ॥ ग्रहगणिंसूर्यत्यापरी ॥१४॥ प्रज्वलितकुंडींमुनिद्वय
शीर्ष ॥ प्रयोगसूत्रादिऋषीश्वरघोष ॥ अवदानअर्पितांबलिसंतोष ॥ दाताविशेषमु
निवरा ॥१५॥ पंचवर्षात्मकवयसावामन ॥ बटुब्रह्मचारीलघुऱ्हस्वमान ॥ कौपीन
मेखलोपवीतआजिन ॥ छत्राणिसानकमंडलु ॥१६॥ विराजितमंदगतियाचकरूप॥
येऊनिपावलामंडपासमीप ॥ बलिनेंपाहतांवामनस्वरूप ॥ अतिसुखरूपजाहला
॥१७॥ बलिनेंकरूनिसाष्टांगनमन ॥ हेमरत्नांकितदीधलेआसन ॥ अर्घ्यपाद्यान्वि

9A

तकरूनिपूजन ॥ प्रार्थनावचनेंबोलिला ॥१८॥ मागबटुवर्यांमनेप्सितकाम॥ गोरत्न
अथवाधान्यधनधाम॥वामनवदलाअतिअल्पकाम ॥ त्रिपादभूमिदेमजला ॥१९॥ब
लिरुवाच ॥ याहूनिबहुविधमागसिकाहि ॥ देईनतुजप्रतिवामनातेंहि ॥ बटुवदेइतु
केनिसंतोषपाहि ॥ भूमिलवलाहिदेमजला ॥२०॥ याचकयाचनाकरिजरिस्वल्प ॥
दातयामानसींनुपजेविकल्प॥सत्वरममकरिंसोडिसंकल्प॥बहुकोटिकल्पसुखीहो २१
बलिरत्नपात्रींआणवितपाणि ॥ वामनवोडविप्रतिग्रहपाणी ॥ उशनाजाणूनिमनिंच
रूपाणि॥पात्रगतपाणरोधिता॥२२॥वामनेंलक्षूनिभार्गवचरित्र॥दर्भप्रवेशनलघुमुख
पात्र॥करूनिफोडिलादैत्यगुरुनेत्र ॥ निघेभृगुपुत्रनारदा ॥२३॥तैंपासूनिकाविएकाक्ष
जाहला॥अत्यंतखिन्नतापाऊनिथिजला ॥जाऊनिब्राह्मणसमाजींबैसला ॥ बहुहेळसी
लायाजकीं॥२४॥ गौतमीमहात्म्यींनसेंहेंलिखित॥वामनपुराणींलिहिलेंसंमत ॥श्रोता
नमानोमनींरचनाकल्पित॥ पुर्वश्रवणातपहावें ॥२५॥ बटुहस्तिंपडतासंकल्पवारि ॥
त्रिविक्रमजाहलावामनावतारीं॥एकपदेंझांकूनिवसुधासारि ॥ द्वितियेंअंबरव्यापिलें
॥२६॥ श्रीभगवानुवाच ॥ तीसऱ्यापदांभूमिकाकेउतिआहे ॥ ह्मणताविस्मितबळिरा

जपाहे ॥पाशवरेंबद्धविष्णुकरिताहे ॥ बलिह्मणेदेहअर्पितो ॥२७॥त्रिपादभूमितुजदत्त
प्रमाणी॥नातळोअनृताममसत्यवाणी ॥ यालागिदीधलिपृष्टिप्रभुचरणीं ॥सुकीर्तीपुरा
णींविराजे ॥२८॥ पुनरानुवादेइंदिरारमण ॥ राज्यरसातळींदीधलेंप्रमाण ॥अक्षयभो
गीनसेबलिमरण॥ अन्यवरजाणमागपै ॥२९॥ बलिराजबोलेमधुकैटभारी ॥ प्रतिग्रह
कर्ताबटुब्रह्मचारी ॥ तेरूपसर्वदाअसोममद्वारीं ॥ तथास्तुश्रीहरिबोलिला ॥३०॥ क
रूनिरसातळींरावदैत्येंद्र ॥ परिवारेंवेष्टितजैसासुरेंद्र ॥ द्वाररक्षकप्रभुजाहलाउपेंद्र
परिसेमुनींद्रअद्यापी ॥३१॥ इकडेविष्णुपदस्वर्गोलव्याप्त ॥ झालियापूजितिसुरलो
कसप्त॥श्रीपदमजलागिझालियाक्षिप्त॥पूजानिप्राप्तमिझालो ॥३२॥ शिवाभिमंत्रितक
मडलुवारी ॥ विष्णुपदींअर्पणपूजोपचारीं॥कारितांतोयार्धश्रीपदाउपरी ॥ चतुर्धाल
हरीजाहल्या ॥३३॥ पश्चिमदिग्भागतोयसर्वत्र ॥ पुनरपिकमंडालिंआलेअत्र ॥ उ
दर्गीरसातलप्रवाहपुत्र ॥ पूर्वसुरपित्रसेविती ॥३४॥ याम्यदिशागतप्रवाहउदक ॥
बहुकडकडाटेंयेतांभूलोक ॥ शंभवेंपुढाराकरूनिमस्तक ॥ विषाग्निशामकरक्षिले ॥३५॥ २
पूर्वदिक्तोयस्वर्गींमंदाकिनी ॥ उत्तरप्रवाहपाताळभोगिनी ॥ वारुणीचेयेकमंडलु

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(10A)

जीवनी ॥ तोयपरतूनितापसा ॥३६॥ याम्यदिशाजळशिवजटाजूट ॥ त्यामाजिगं
गानदिसेचिप्रगट ॥ शंकरेंजटेचाबांधिलामुगुट ॥ वर्षेबहुकोटिमुनींद्रा॥३७॥ नारद
उवाच॥शिवजटाजूटिंअतिपुण्यगंगा॥कैसेनिहोसरेभूमितलसंगा॥कोणत्याप्रकारेंकव
ण्याप्रसंगा॥लोकभवभंगानिरूपि ॥३८॥ ब्रह्मोवाच॥ शिवजटाविराजितगंगादेवी॥
प्रथमताआणिलीअर्धभूदेवीं ॥पश्चातनारदाआणिलीपार्थिवीं ॥ कारणपरत्वेंमुनींद्रा
॥३९॥नारदउवाच॥पूर्वीकिमर्थआणिलिब्राह्मणें॥तदुपरिभुपाळेंकैशाकारणें॥द्विभेदगं
गानिरूपणाकरणे ॥ कृतार्थश्रवणेहोतसे ॥४०॥ ॥ब्रह्मोवाच ॥ गौतमऋषिनेंआणि
लीप्रथम ॥ नंतरभगीरथराजसत्तम ॥ प्रसन्नकरूनिशंकरपरम ॥ गंगासायासेंआ
णिली ॥४१॥ हेंतुजमुनिवरासांगतोआधी ॥ तदुपरिसागेनगोदाप्रसिद्धी ॥ प्रयत्नें
भगीरथपावलासिद्धी ॥ ऐकमहाबुद्धीआदरें ॥४२॥ पूर्विंशक्रसमभूपाळसगर ॥ त्यां
प्रातिनारदानसेचिकुमर ॥ यालागिनृपतिकरूनिविचार ॥ श्टंगऋषीश्वरआणिला
॥४३॥ तयानेंकरूनिमखपुत्रइष्ठी ॥ अंगनानृपाप्रतिआसतिषष्ठी ॥ पुरोडाशभक्षि
तांबहुसंतुष्टी ॥ सहस्त्रषष्ठीसुतजाहले ॥४४॥ गुणरूपकायादृढबलवंत ॥ विद्यावि

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

शारदअतिबुद्धिमंत ॥ ऐश्वर्यमंडितपराक्रमदात ॥ सगरअत्यंतसुखावे ॥४५॥ नरें
द्रसुरपतिमानीतअल्प ॥ शतमखनृपाळागमतीस्वल्प ॥ बहुहेमरत्नादिगणअत्य
ल्प ॥ करिसंकल्पमुनिवरा ॥४६॥ तत्काळआणूनिहयशामकर्ण ॥ सभार्यदीक्षित
ऋत्विजप्रकर्ण ॥ हयोत्तमासोडीतसैन्यसंकीर्ण ॥ पुत्रसंपूर्णआयुधेसी ॥४७॥ निघा
लेगजरथहयाचेथाट ॥ पदातियाप्रतिनमिळेचिवाट ॥ होतवाद्याचाबहुकडकडाट ॥ सै
न्यसंघाटमुनिवरा ॥४८॥ याचेनिथरथराकापलिधरणी ॥ पुरंदरडचकेअंतःकरणीं ॥
करिताजाहलाविचित्रकरणी ॥ तीशक्रसरणीसांगतो ॥४९॥ नर्मदोत्तरतीरिंगुर्जरामा
जीं ॥ सुरेंद्रप्रवर्तैमुनिचौर्यकाजीं ॥ गुप्तरूपेंयेऊनिसेनासमाजीं ॥ निशार्धींवाजीहारि
येला ॥५०॥ कपिलमुनीचागृहांतरयामीं ॥ ठेऊनिहयवरआकाशगामी ॥ जाताजाह
लाअमरपुरयामीं ॥ सुरराज्यकामिनारदा ॥५१॥ सैनिकदिनोदयींजागृतजाहले ॥
ह्मणतीहयाप्रतिकवणेनेलें ॥ सागरींस्वर्गमृत्युशोधनकेलें ॥ रसातळींगेलेंसत्वर ॥५२
यज्ञाश्वनलभेयालागिपुनर ॥ एकत्रबैसोनिराचिलाविचार ॥ भूमिसीखाणितितैराजकु ३
मर ॥ खाणितप्रकारदिग्गजा ॥५३॥ परियंतनेऊनिपुसातितयासीं ॥ तावदेविचारा

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

# मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com